लोकसत्ता दि: १७ जानेवारी, २०२४.

# मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ

(म्हाडाचा घटक)

म्हाडा MHADA

## जाहीर सूचना

बृहतसूचीवरील पात्र भाडेकरु/रहिवाशी सदनिका वितरण करणेबाबत मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या दि. २२/१२/२०२३ रोजीच्या परिपत्रकानुसार मार्गदर्शक तत्वे/सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार दि.२८/१२/२०२३ रोजी बृहतसूचीवरील २६५ प्रात्र भाडेकरु/रहिवाशी संगणकीय प्रणालीद्वारे सदनिकांची सोडत काढण्यात आली आहे.

या संगणकीय सोडतीतील विजेत्या भाडेकरु/रहिवाशी यांना सदनिकांचे वितरण पत्र संगणकीय प्रणालीद्वारे काढण्यात येणार आहेत. सदर भाडेकरु/रहिवाशी, किंवा त्यांचे वारसदार/अर्जदार यांना कळविण्यात येते की, दि.२२/१२/२०२३ च्या परिपत्रकातील तरतूदीनुसार दि.२८/१२/२०२३ रोजीच्या सोडतीपासून पुढील १५ दिवसाच्या आत त्यांना घोषित झालेल्या सदनिकेचे स्विकृती पत्र उपमुख्य अधिकारी/पुगा/दु.व.पु. मंडळ यांच्या कार्यालयात, कक्ष क्र. ३७२, दुसरा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू), मुंबई - ४०० ०५१ येथे सादर करावे.

स्वीकृतीपत्र उपरोक्त नमूद दि.२२/१२/२०२३ रोजीच्या परिपत्रकातील नमूद तरतूदीनुसार १५ दिवसांच्या आत मंडळास प्राप्त न झाल्यास भाडेकरु/रहिवासी/अर्जदार यांना संगणकीय सोडतीद्वारे प्राप्त झालेली सदनिका घेण्यामध्ये स्वारस्य नाही असे गृहित धरुन वितरण रद्द करण्यात येईल. तसेच त्यांचा बृहतसूचीवरील सदनिका वितरणाचा हक्क कायमचा संपुष्टात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-

**उपमुख्य अधिकारी/पु.गा.**

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ

CPRO/A/75

मुंबई